M. S. Board Of Secondary And Higher Secondary Education,
Mumbai Divisional Board, Vashi, Navi Mumbai-४०० ७०३.
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
मुंबई विभागीय मंडळ, वाशी,नवी मुंबई-४०० ७०३.

जा.क्र. मुंविमं/मा.वि.स.स्वी.स/१३७४ दिनांक - १५/०७/२०२४

// प्रशंसापत्र //

प्रति,
मुंबई विभागातील सर्व परीक्षक / नियामक /मुख्य नियामक,
केंद्रसंचालक / परिरक्षक.

विषय :- फेब्रुवारी / मार्च २०२४ चे परीक्षापुर्व, परीक्षा काळात व परीक्षोत्तर कामातील प्रशंसनीय योगदानाबाबत.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे दरवर्षी फेब्रुवारी / मार्च महिन्यात माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र अर्थात HSC व SSC परीक्षा घेतली जाते. साधारणपणे या परीक्षेच्या कामांचे तीन टप्पे पडतात.

(१) परीक्षापुर्व तयारीचे काम

(२) प्रत्यक्ष परीक्षा संचालनाचे काम

(३) परीक्षोत्तर काम (निकालपूर्व उत्तरपत्रिका तपासणी, निकालोत्तर गुणपडताळणी व पुनर्मुल्यांकन)

या तीन बाबींचा त्यात समावेश होतो.

रुढ अर्थाने व जनसामान्यांच्या दृष्टीने बोर्ड परीक्षा सामान्यपणे केवळ २ ते ३ तासांची असली तरी परीक्षापूर्व तयारी ते परीक्षोत्तर कामकाज संपेपर्यंत वरीलप्रकारे वर्षभर परीक्षेशी संबंधित कामकाज अविरतपणे मंडळात सुरु असते. मुंबई विभागीय मंडळ हे राज्यातील सर्वात मोठे मंडळ आहे. ज्यात सुमारे ८ लाख विद्यार्थ्यांची परीक्षा दरवर्षी घेतली जाते. त्यादरम्यान सुमारे ७० लाख उत्तरपत्रिकांचे परीक्षण व नियमन केले जाते.

त्यासाठी वरील तीन टप्प्यांमध्ये परीक्षक, नियामक, मुख्य नियामक, केंद्रसंचालक, परिरक्षक यांची व त्यांच्या अधिनस्त सहकाऱ्यांची सेवा कमी-अधिक प्रमाणात अधिग्रहीत केली जाते. त्या सेवेच्या माध्यमातून प्रामुख्याने प्रत्यक्ष परीक्षा संचालन व परीक्षोत्तर निकालाचे कामकाज केले जाते. सन २०२४ च्या फेब्रुवारी / मार्च परीक्षेसाठीही परीक्षक, नियामक, मुख्य नियामक, केंद्रसंचालक, परिरक्षक यांच्या सेवा अधिग्रहीत केल्या गेल्या होत्या. त्याकाळात वरील सर्व घटकांनी मुंबई विभागीय मंडळाशी उत्तम समन्वय राखून परीक्षासंचालन, उत्तरपत्रिका मूल्यांकन, पुनर्मूल्यांकन कामात उत्तम योगदान दिले आहे. या योगदानामुळे आज दिनांक १५/०७/२०२४ रोजी फेब्रुवारी / मार्च २०२४ परीक्षेची पुनर्मूल्यांकन प्रक्रिया पुर्ण झाली असून **खऱ्या अर्थाने आज फेब्रुवारी / मार्च २०२४ च्या परीक्षेची सांगता झाली आहे.**

आपण नेमून दिलेल्या विहित कालावधीत राज्य मंडळाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार व वरिष्ठांच्या सूचनेनुसार कोणताही गोपनीयतेचा भंग होऊ न देता सर्वांनी आपले कर्तव्य चोखपणे बजावले आहे. त्याचे परिणामस्वरुप यंदा आपण विक्रमी वेळेत इयत्ता १२ वी आणि इयत्ता १० वी परीक्षेचा निकाल पाहू शकलो. तसेच गुणपडताळणी, पुनर्मूल्यांकन ही निकालोत्तर कामेही विहीत वेळेत पुर्ण करु शकलो . ज्यामुळे विद्यार्थ्यांना पुढील अभ्यासक्रमाच्या प्रवेशाचे मार्ग वेळेवर उपलब्ध होऊ शकले.

या कामी मंडळ अधिकारी / कर्मचारी यांची भूमिका तर महत्त्वाची आहेच, परंतु याकामी विभागीय मंडळाच्या सूचनेनुसार आपण यंदा साधलेला समन्वय आणि दिलेले योगदान कौतुकास्पद आहे.

परीक्षा जरी मंडळ घेत असले तरी, ज्या विद्यार्थ्यांची परीक्षा घेतली जाते, ते विद्यार्थी आपल्याच शाळा, महाविद्यालयात ज्ञानदान घेऊन पुढे जात असल्याने त्यांची भविष्यकालीन वाटचाल निश्चित करण्याची जबाबदारीही आपसूकच आपणावर येऊन पडते. ही जबाबदारी मात्र आपण फेब्रुवारी / मार्च २०२४ च्या परीक्षेत उत्तमपणे पार पाडून प्रशंसनीय काम केले आहे. त्याबद्दल मुंबई विभागातील सर्व परीक्षक, नियामक, मुख्य नियामक, केंद्रसंचालक, उपकेंद्रसंचालक, पर्यवेक्षक, समवेक्षक, परिरक्षक, उपपरिरक्षक, धावक, सेवक तसेच आपल्या अधिनस्त सर्व सहकाऱ्यांचे अभिनंदन ! त्यासोबतच आपणास या कामी प्रोत्साहन देणारे मुख्याध्यापक / प्राचार्य व व्यवस्थापन मंडळ यांना धन्यवाद ! आणि उद्या दिनांक १६ जुलै, २०२४ पासून सुरु होणाऱ्या माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र पुरवणी परीक्षाकामी शुभेच्छा !

(डॉ. सुभाष बोरसे)
विभागीय सचिव
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक
शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय मंडळ,
वाशी, नवी मुंबई - ४०० ७०३